PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 3, ISSUE 3

# स्त्रीवाद - मुक्तचर्चा आणि लोकसाहित्यातील 'हुंकार'

**प्रा. अतुलकुमार सारडे**
जिजामाता कला महाविद्यालय,
दारव्हा जि. यवतमाळ.
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

स्त्रीवादाचा जागतिक स्तरावरील ऊहापोह सध्या खूपच चर्चेचा विषय आहे. स्त्रीवादाला आता उपक्रमिक स्वरूप दिल्या जात आहे. मुळात स्त्री आणि वाद ह्या दोन गोष्टीच परस्पर भिन्न आहे. परंतु, स्त्रीच्या संबंधातील कुमकुवत दुव्यांचा मुद्देसुद वापर करून त्याला ज्यांनी त्यांनी 'स्त्रीवाद', 'स्त्री चळवळ', 'स्त्री-साहित्य', ही नावे देवून सवंग प्रसिद्धीची माध्यमे बनवलेली आहे. या सजीव-सृष्टीमध्ये प्रत्येक घटक केव्हा ना केव्हा, कधी नं कधी, कुठे ना कुठे संघर्षाला समोर जातोच. त्यात सर्वासोबत 'स्त्री' आलीच. त्यामुळे 'स्त्री' सोबत पारिस्थितिक संदर्भाने घडलेल्या अनुषंगिक बाबींचा असा काही आगडोंब करून घेतला गेला की त्याचे चित्रण हे पुढे विचित्र अंगाने आणि वळणाने दिसू लागले.

या शोधनिबंध लेखनासाठी संकलनपद्धत आणि आस्वादकवर्णनपद्धत वापरण्यात आली आहे.

**स्त्रीवाद आणि चळवळीचे स्वरूप :**

स्त्रियावरील अन्याय, अत्याचार आणि मनःस्वी संवेदनांना उजागर करणारे मतप्रवाह म्हणजे स्त्रीवाद, असे मी मानतो. मग ते पुरुषांचे असले तरीही. त्यांच्या सखोल अन् गुळगुळीत व्याख्या सांगण्याच्या फंदात मी पडणार नाही. वर उल्लेखित केल्या प्रमाणे ज्या घटकांनी स्त्रियांच्या अन्याय, अत्याचार, व्यवस्था आणि संवेदनांना उजागर केले ते घटक वैचारिक असो, वाड्.मयीन असो किंवा उपक्रमिक किंवा कृतीशील असो, ते ते 'स्त्रीवादी' म्हणून गणल्या जाईल. त्यात स्त्रीवादी लेखन-वाड्.मय आले, स्त्रीवादी भाषण आले, स्त्रीवादी चळवळी-आंदोलने आलीत. ही घटकांची परंपरा संबंध सजीव सृष्टीतील नारी (मादी) घटकांशी निगडीत आहे. पण, प्रामुख्याने ती मानव (Human Being) ह्या विचारप्रवण- बुद्धिवादी घटकासोबत संपूर्णपणे निगडीत आहे. कारण, जनावरांपेक्षा-पशुपक्षीप्राण्यांपेक्षा 'माणूस' हा या सृष्टीचा सर्वात महत्वाचा क्रियाशील व उत्क्रांतीवादी घटक आहे. मानवाच्या उत्क्रांत अवस्थेपासून आजतागायत घडणाऱ्या प्रत्येक उलथापालथी 'माणूस केन्द्री' च राहिल्या आहे. म्हणून स्त्रीवादाचाही उल्लेख त्याच संदर्भाने येतो. प्रत्येक युग आणि कालखंडात स्त्रियांच्या संदर्भात घडलेल्या घटकांनुसार स्त्रीवादाचे आणि स्त्री चळवळीचे स्थान विभिन्न प्रकारचे राहिले आहे.

**स्त्रीवादाचे जागतिक आणि भारतीय विचार :**

स्त्रीवादाच्या चळवळीचे पहिले जागतिक बीज एकोणीसाव्या शतकात १८६७ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटमध्ये पडले. 'सिमॉन दि बोव्हा' या फ्रेंच लेखिकेच्या 'दि सेकंड सेक्स' या १९४९ सालच्या स्त्रीवादी लेखनाने तर प्रचंड खळबळ उडवून दिली. त्याचे लोण पुढे भारतापर्यंत पोहचले. मात्र, भारतात तत्पूर्वीच बौद्ध संप्रदायाच्या 'थिरीगाथेतून' या स्त्रीवादी भूमिकेचा प्रचंड पाठपुरावा झाला असल्याचे मत भारतातील अनेक विचारवंत आणि बौद्धविचार प्रणाली मांडते. हिंदू विचारप्रणालीनुसार हिंदू संप्रदाय नारी सन्मान करते आणि व्यवस्थेला टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक तेथे निश्चितपणे स्त्री गुलामगिरीला विरोधच करते, अशा मताचे प्रतिपादन भारतातील समन्वयवादी विचारसरणी करते. त्यात संस्कारशील लेखन-भाषण करणारा वर्ग येतो. थोडक्यात, एवढे म्हणू शकतो की, स्त्रीवादाचा उगम हा जागतिक आणि भारतीय स्तरावर आगेमागे झाला असेलच. परंतु, स्त्रीविषयक प्रश्न निर्माण होवून त्याचा

समाजावर होणाऱ्या घटक परिणामांच्या बाजू लक्षात आल्यावरच तो भाग प्रकर्षाने पुढे आला. पुढे इतिहास आणि भवितव्य- 'सुज्ञास सांगणे न लगे.'

**लोकसाहित्यातून निर्माण झालेला स्त्रीवादाचा 'हुंकार' :**

स्त्रीवादाच्या उगमाची बीजधारणा पाश्चात्याकडून झाली की भारतीयांकडून झाली, हा मुद्दा चर्चेचाच आहे. जागतिक पातळीवर तो पाश्चात्यांनी चर्चेला आणला. भारतीय परंपरेने तो बौद्ध परंपरा आणि हिंदू परंपरेतून आल्याचे आग्रही प्रतिपादन केले. मात्र, माझ्या मते, त्याचा 'हुंकार' लोकसाहित्यातूनच निर्माण झाला. लोकसाहित्याच्या विविध पदरांमधून विविध प्रादेशिक आणि कालखंडानुरूप त्यातील स्त्री जाणीवेच्या संवेदना आणि हुंकार निर्माण होताना दिसतो. परिस्थितीजन्य विचार करता आपण त्याला तत्कालीन स्त्रीवाद मुळीच म्हणू शकणार नाही. मात्र, अलिकडे निर्माण झालेल्या स्त्रीवादाची संपूर्ण पार्श्वभूमी त्यातूनच दिसून येते. म्हणूनच,स्त्रीवादाचा पहिला 'हुंकार' लोकसाहित्यामार्फत उठला, असे माझे स्पष्ट मत आहे. लोकसाहित्याची निर्मिती 'अज्ञाता' कडून झालेली आहे. तिला धर्म-पंथ-वाद या गोष्टीत बांधता येणार नाही. लोकसाहित्य हे परंपरेने व मौखिक रितीने चालत आलेले 'वाड्.मय' आहे. आणि आपल्या संस्कृतीने 'संस्कार धन-शब्द धन' म्हणून त्याला गौरविले आहे. त्यातील विविध प्रकारातून स्त्रियांचे राहणीमान, जगण्याच्या पद्धतीचा उल्लेख आलेला आहे. त्यांचे कुटुंब, त्यातील ताणेबाणे, संवेदना, संस्कारशील जगणे हे सर्वच लोकसाहित्यातून विदित होते. विशेष म्हणजे, शतकानुशतके स्त्रियांच्या स्थितीगतीचा आलेख त्यातून व्यक्त होतो. किंबुहना, मी म्हणेन, स्त्रियांच्या बाबतीतील त्याकाळची स्थिती आणि आजची स्थिती याची तुलना केल्यास असे दिसून येईल की, स्त्री- म्हणावी तेवढी जागृत झालीच नाही. तिच्यावर झालेला 'रडगाणं गाणारी' हा आरोप अद्यापही पुसला गेला नाही घरातील कामे, चुलं आणि मुलं हे क्षेत्र, सासुरवास आणि नणंदवास-नवरावास, भोगवस्तू म्हणून पाहण्याची दृष्टी, अपशकुनी म्हणूनचा ठप्पा, 'अबला' म्हणून हिणविल्या जाण्याचा प्रकार, समाजासाठी दुय्यम दर्जाची वस्तू म्हणून शिक्का या लोकगीतांमधून व्यक्त झालेल्या बाबी आजही तशाच शिल्लक आहे (थोडाफार अपवाद वगळता) लोकसाहित्यातील लोकगीतांतून जी स्त्री अभिव्यक्त झाली, ती तिच्या सर्व संवेदनांसह. लोकगीतातील व्यक्त होणार्या शब्दांतून, वर्णानातून स्त्रीविषयक मनःप्रवृत्तीचे दर्शन घडते. सोबतच, तिचा 'हुंकार' ही कळून येतो. जात्यावरील ओव्यांमधून स्त्रियांनी

स्वतःला, कुटुंबाला, दुःख संघर्षाला आणि भावविश्वाला ओवीबद्ध केले आहे. ती ओवी गायन करत असली तरी तिला 'अभिव्यक्त' होण्याचा तो एक मार्ग आहे. त्या 'तिच्या' अभिव्यक्त होण्यालाच मी 'हुंकार' संबोधले आहे. ज्याप्रमाणे, दलित वाड्.मयाचा 'पहिला हुंकार' कोणी मानो नं मानो परंतु चोखमळ्याच्या अभंगरचनेत शब्दबद्ध झाला, त्याचप्रमाणे, लोकसाहित्यातील लोकगीतांतून स्त्रीवादी साहित्याचा 'हुंकार' निर्माण झाला आहे. लोकसाहित्याच्या सर्वच घटकांतून कमीजास्त प्रमाणात स्त्रीविषयक स्थितीगतीवर भाष्य करण्यात आलेले आहे.

**भोंडल्याच्या-बाहुल्यांच्या गाण्यातील स्त्रीवादी हुंकार :**

महाराष्ट्रात बहुसंख्य प्रदेशात शरदऋतूत नवरात्रानंतर दिवाळीपूर्वी बाहुल्या म्हणजेच भोंडला मांडण्याची परंपरा आहे. या निमित्ताने विविध गाणी गायली जातात. खेळ खेळले जातात. खिरापती वाटल्या जातात. या बाहुल्यांच्या गाण्यांची म्हणण्याची सुरावट, विशिष्ट पद्धतीचा हेल लावून, धावत्या स्वरुपात एकामागून एक रचनाबद्ध, यमक जुळवित अशी असते. स्त्रियांच्या संपूर्ण भावविश्वाला अभिव्यक्त करण्याचा तो जणू उत्सव असतो. 'पहिली गं पुजाबाई......' या गाण्यापासून तर 'बाणाबाई बाणा-गाणे संपले खिरापत आणा' पर्यंतची विविध गाणी स्त्रिया, मुली गत असतात. या गीतामधील सासरच्या वाटे कुचूकुचू काटे, कारल्याचं बी, झिपरं कुत्रं सोडा गं बाई, अस्सं सासर द्वाड बाई, यादवराया राणी रुसून बैसली कैसी, चांदण्या रात्री, शिक्यावरचं लोणी, तुझ्या ग माहेरच्यांनी काय काय दिले ..... या आणि अशा अनेकविध प्रादेशिक गीतातून स्त्रीवरील अन्याय, तिची कुचंबना, सासूरवास, आज आपण ज्याला हुंडा म्हणतो ती देण्याघेण्याची पद्धत, सतत सुनेला कामात गुंतून ठेवण्याची पद्धत या बाबींचे वर्णन आले आहे. त्यासोबतच, अशा सुनेला (स्त्रीला) साहाजिकच तिचे 'माहेर' आठवते. तिथला मुक्त व स्वच्छंदी जीवनाचा भाग आठवतो. जिव्हाळ्याचे आईबाबाभाऊ आठवतात. आणि नेमके हेच वर्णन त्या गीतांतून व्यक्त होते. म्हणजेच तिचा दबलेला, कोंडलेला श्वास ती मोकळा करते. याच तिच्या 'अभिव्यक्त' होणाऱ्या स्त्रीच्या शब्दांना मी तिचा 'हुंकार' मानतो. या हुंकाराला कोणताही धर्म-पंथ-जात नाही. स्त्रीवादाचा हा लोकसाहित्यातील 'हुंकार' च पुढे आधुनिक स्त्री चळवळीचा, स्त्री-आंदोलनाचा, स्त्री-लेखनाचा, स्त्री-वादाचा 'पाया' ठरला. म्हणून, पुढे स्त्रीवादाने स्वतंत्र कक्षा स्वीकारली आणि ती रूंदावली सुद्धा.

## संदर्भ :-

१. स्त्रीवादी समीक्षा - संकल्पना व उपयोजन-सं.मंगला वरखेडे, १९९९, का.स. वाणी संस्था, धुळे.

२. ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य (मराठी २११ पुस्तक) य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

३. भुलाबाईंची गाणी-सं.भारती जडे-श्रीकृपा प्रकाशन, नागपूर.

४. भुलाबाईच्या गाण्यातील स्त्री जीवन-डॉ.ममता महल्ले-इंगोले, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २०१७